# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० | फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ | E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला, सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४०० ००१


**परिपत्रक** जा.क्र.राआसो/मनुष्यबळ कक्ष/ सुधारित पदभरती समिती/ /२०२३

१०२६६-१०६००

दिनांक -२६.०४.२०२३

**विषय – राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत पदभरतीसाठी विविध स्तरावरील सुधारित समिती गठीत करणेबाबत.**

**संदर्भ –** १. सन २०२२-२३ मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा.

२.या कार्यालयाचे पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ/समिती-गठन/७४९३४-७५१७७/१८ दि.०५.१२.२०१८ रोजीचे पत्र

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. राआसो/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती समिती/१६५४५०-७४६/२०२२ दिनांक- २४.११.२०२२

४.जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय अहमदनगर,यांचे पत्र क्र.एन.एच.एम/ डीपीएमएय/भरती बाबत मार्गदर्शन/२०८/२३ दि.१७/०३/२०२३

५. या कार्यालयाची मंजुर टिपणी.

**प्रस्तावना–**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रतिवर्षी मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनामार्फत मंजुर करण्यात येतो. सदर आराखड्यामध्ये कंत्राटी तत्वावरील विविध आरोग्य कार्यक्रमांतर्गत पदे मंजूर करण्यात येतात. त्यानुसार मंजूर पदांच्या अधिन राहून विविध स्तरावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येते. संदर्भ क्र.२ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एकाच समितीद्वारे पदभरती करण्यात येत होती. तथापि, संदर्भ क्र.३ नुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती प्रक्रीयेसाठी जिल्हास्तरावरील जिल्हा शल्य चिकित्सक अधिनिस्त पदे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी अधिनिस्त पदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली भरण्यात येत आहेत. परंतु, एकाच जिल्ह्यामध्ये दोन पदभरती समिती असून सदरील समित्यांमार्फत पदभरती करतांना स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्यामध्ये मुख्यते करून बिंदुनामावली बनविताना विविध अडचणी उद्भवत असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत संदर्भ क्र.४ अन्वये अहमदनगर जिल्ह्याने पूर्वीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एकच समिती पुनर्गठीत करून पदभरती करणे बाबत परवानगी मागितली आहे. तसेच इतर जिल्ह्यांमार्फत देखील भ्रमणध्वनी द्वारे विचारणा होत आहे. त्यानुसार सदर समिती मध्ये बदल करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती.

## निर्णय-

प्रस्तावनेत नमूद कारणांचा साधकबाधक विचार करून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा आरोग्य सोसायटीचे अध्यक्ष असल्यामुळे दोन समितीऐवजी एकाच समितीमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पदभरती प्रक्रिया करण्याबाबत या निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे समित्या सुधारित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | जिल्हा स्तरावरील पदभरती समिती |
|---|---|
| १. | अध्यक्ष - मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | सदस्य - जिल्हा शल्य चिकित्सक |
| ३. | सदस्य सचिव- जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ४. | सदस्य - माता व बाल संगोपन अधिकारी |
| ५. | सदस्य - जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक |
| ६. | सदस्य - संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी / विषय तज्ञ |

| अ.क्र | महानगरपालिका स्तरावरील पदभरती समिती | नगरपालिका स्तरावरील पदभरती समिती | परिमंडळ स्तरावरील पदभरती समिती |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष- आयुक्त , महानगरपालिका | अध्यक्ष- मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष- उपसंचालक परिमंडळ |
| २. | सदस्य सचिव - वैद्यकीय आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव- तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य सचिव- परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक |
| ३. | सदस्य - माता व बाल संगोपन अधिकारी | सदस्य - जिल्हा प्रशासकीय अधिकारी (नगरपालिका), जिल्हाधिकारी कार्यालय | सदस्य- प्राचार्य आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र/राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था नागपूर |
| ४. | सदस्य - शहर कार्यक्रम व्यवस्थापक | सदस्य- मुख्याधिकारी (न.पा.) | सदस्य - सहाय्यक संचालक |
| ५. | सदस्य- संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी/ विषय तज्ञ | सदस्य - जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | सदस्य -संबंधित कार्यक्रमाचे प्रतिनिधी / विषय तज्ञ |

अभियानांतर्गत मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याच्या अधिन राहून विविध आरोग्य कार्यक्रमांची कंत्राटी पदभरती व बाह्यस्त्रोत यंत्रणेव्दारे भरावयाची पदे/ सेवा, ऑन कॉल तत्वावरील पदे इ. उपरोक्त तक्त्यात नमुद समितीव्दारेच भरण्यात यावी. तसेच अभियानांतर्गत रिक्त होणा-या पदांची पदभरती ही अविरतपणे सुरु ठेवण्यात यावी.

धीरज कुमार (भा.प्र.से)
आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई

प्रति,

१) जिल्हाधिकारी, (सर्व)

२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
५) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (राअंनिका/असंसर्गजन्य रोग), मुंबई
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
८) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे
९) संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर
१०) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे
११) उपसंचालक , आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
१२) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुषा), पुणे
१३) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व),
१४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
१६) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)
१७) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प, पुणे)
१८) कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे.

**प्रत कार्यवाहीस्तव-**

१. परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
२. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक/ जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा परिषद, (सर्व)
३. शहर कार्यक्रम व्यवस्थापक/ शहर लेखा व्यवस्थापक, महानगरपालिका (सर्व)

**प्रत माहितीस्तव -**

१. संचालक, आरोग्य सेवा मुंबई/पुणे,
२. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७. सहाय्यक संचालक (एनयुएचएम), राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई
८. सहाय्यक संचालक (आयुष), राष्ट्रीय आयुष अभियान, मुंबई
९. सहाय्यक संचालक (रक्तकक्ष), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
१०. राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, (एनएचएम/एनयुएचएम), राआसो, मुंबई
११. कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई